# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 16/12/2023 (शनिवार) दुपार

---

### जिवानीशी ठार करणाऱ्या आरोपीला अटक

पो.स्टे. पारशिवनी :— अंतर्गत ११ कि. मी. अंतरावरील मौजा नवेगाव खैरी (टोली) येथे दिनांक ०२/१२/२०२३ चे २१.०० वा. दरम्यान यातील **आरोपी नामे— राजकुमार दमडु कुंभरे, वय ३५ वर्ष रा. सालई मोकासा ह. मु. नवेगाव खैरी टोली** हा **मृतक नामे— मधुकर फुलचंद धुर्वे, वय ४० वर्ष, रा. नवेगाव खैरी (टोली) ता. पारशिवनी** याचा जावई असुन त्यांचेच घरी राहात असुन मृतक याने दारू पिऊन आरोपी जावई याला माझा घरून निघुन जा असे म्हणुन शिवीगाळ करीत असल्याने आरोपी याने घरातील लाकडी काठीने मृतक याला जिवाने ठार होईल असे मृतकच्या डोक्यावर मारून गंभीर दुखापत केली. मृतकचा प्रथम उपचार ग्रामिण रूग्णालय नवेगाव खैरी येथे करून तेथुन रेफर केल्याने मेडीकल हॉस्पीटल नागपुर येथे ट्रामा आयसीयु २ मध्ये भरती केले असता मृतक हा उपचारादरम्यान दि. १४/१२/२०२३ चे २३/४५ वा. मरण पावला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— सरतर्फे पोहवा राजेश माकडे यांच्या रिपोर्टवरून पोलीस स्टेशन पारशिवनी येथे आरोपीविरुध्द कलम ३०२ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. यातील आरोपीला अटक करण्यात आली असुन गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक शिवाजी भताने मो. क्र. ९५५२८०४३८८ हे करीत आहे.

### विनयभंग करणाऱ्या आरोपीला स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने केले अटक

पो.स्टे. सावनेर :— फिर्यादी वय १६ वर्षे ही शुक्रवार दिनांक ०१/१२/२०२३ रोजी रात्री ०७.०० वाजता दरम्यान आरोपी नामे— बंटी चौकसे, वय २९ वर्ष, रा. नक्षत्र झोपडपट्टी यांची पत्नी ही फिर्यादीचे घरी आली आणि आपले घरी पाठीची उसन काढण्यासाठी घेवून गेली होती. तेव्हा आरोपी बंटी चौकसे याने फिर्यादीस म्हटले की, मै तेरे उपर एक चादर डालूंगा और तेरे सामने एक कांस की थाल रखुंगा तुझे उसमे कुछ नंबर दिखेंगे वो नंबर तुने मुझे बताना तो तुझे पैसे मिलेंगे तेव्हा फिर्यादी हिने बंटीला मै ऐसा कुछ नही करूंगी म्हणून घरी निघून आली. नंतर शनिवार दिनांक ०२/१२/२०२३ रोजी सकाळी ११.१५ वाजता फिर्यादी शाळा संपल्यानंतर घरी आली. दुपारी ०१.३० वाजता फिर्यादी आपले घरी एकटी असतांना **आरोपी बंटी चौकसे** हा फिर्यादीला आवाज देत घरात समोरच्या खोलीत आला आणि त्याचे जवळ असलेल्या लहान मुलीला "ये तेरी मौसी है कितनी अच्छी है "असे म्हणून फिर्यादीचे अंगावरून हात फिरवून फिर्यादीला लज्जास्पद वाटेल अशा प्रकारे स्पर्श करून फिर्यादी सोबत छेडछाड केली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी/पिडीता यांचे रिपोर्टवरुन पोलीस स्टेशन सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम ३५४, ३५४(अ), ४५१ सहकलम ८ अ, १२ बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर आरोपीला स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण येथील पथक पोलीस हवालदार राजू रेवतकर, किशोर वानखेडे, उमेश फुलबेल, आशिष मुंगळे, पोलीस नायक विरेंद्र नरड, पोलीस अंमलदार निलेश इंगुलकर यांनी आरोपीस ताब्यात घेवुन पुढील कायदेशीर कारवाई करीता पोस्टे सावनेर यांच्या ताब्यात दिले. गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक मोकासे मो. क्र. ८३८०८५०३५० या करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर